स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२

Website :- www.doa.maharashtra.gov.in Email:- dirdoa.mum-mah@gov.in/ directorateofart@gmail.com

क्रमांक - डिओओ/२०२३/चार/१९०५ दिनांक :- १२.०७.२०२३

वाचावे :- शासन निर्णय क्रमांक /एडीआर-२०१४/प्र.क्र.२१८/तांशि-६, दिनांक १६.०२.२०१५.

## परिपत्रक

शासकीय रेखाकला परीक्षेच्या पुर्नरचित अभ्यासक्रमास संदर्भीय दिनांक १६.०२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुर्नरचित अभ्यासक्रमास सन २०१५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२३ चे आयोजन ऑफलाईन पध्दतीने दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२३ ते दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीमध्ये घेण्यात येणार आहे.

संबंधित केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, शासकीय रेखाकला परीक्षेकरिता विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी करताना दोन्ही पैकी (एलिमेंटरी किंवा इंटरमिजिएट) एकाच परीक्षेसाठी सर्वसाधारण नोंदवहीतील (General Register) नावाप्रमाणे अचूक नावाची ऑनलाईन नोंदणी करावी. शासकीय रेखाकला परीक्षा केंद्रांची नोंदणी, विद्यार्थ्यांची नोंदणी व परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने www.doa.maharashtra.gov.in / https://dge.doamh.in या संकेतस्थळावर भरावयचे असल्यामुळे याबाबत सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या सर्व संबंधित विद्यार्थी, पालक व सहभागी शाळा यांच्या शासकीय रेखाकला परीक्षा केंद्र प्रमुख यांनी निदर्शनास आणावे. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक तसेच ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणाऱ्या नोंदणीचा तक्ता खालील प्रमाणे.

### शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२३

**एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा वेळापत्रक**

| अ.क्र. | विषयाचे नाव | परीक्षेची वेळ |
|---|---|---|
| | *बुधवार, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२३* | |
| १ | वस्तुचित्र (Object Drawing) | १०.३० ते १.०० (२.३० तास) |
| २ | स्मरणचित्र (Memory Drawing) | २.०० ते ४.०० (२.०० तास) |
| | *गुरुवार, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३* | |
| ३ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.०० (२.३० तास) |
| ४ | कर्तव्यभूमिती व अक्षरलेखन (Plane Geometry & Lettering) | २.०० ते ४.०० (२.०० तास) |

**इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| | *शुक्रवार, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२३* | |
| १ | स्थिरचित्र (Still Life) | १०.३० ते १.३० (३.०० तास) |
| २ | स्मरणचित्र (Memory Drawing) | २.३० ते ४.३० (२.०० तास) |
| | *शनिवार, दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२३* | |
| ३ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.३० (३.०० तास) |
| ४ | कर्तव्य भूमिती, घनभूमिती व अक्षरलेखन (Geometry, Solid Geometry & Lettering) | २.३० ते ५.३० (३.०० तास) |

| अ.क्र. | कामाचा तपशील | प्रदान करण्यात आलेली वेळ |
|---|---|---|
| १ | केंद्रांची नोंदणी / केंद्राची माहिती अद्यावत करणे ऑनलाईन पध्दतीने. | दिनांक १४.०७.२०२३ ते दिनांक २१.०७.२०२३ पर्यंत |
| २ | केंद्राच्या अधिनस्त असलेल्या सहभागी शाळांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने. | दिनांक १४.०७.२०२३ ते दिनांक २५.०७.२०२३ पर्यंत |
| ३ | एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे. | दिनांक १७.०७.२०२३ ते दिनांक २१.०८.२०२३ पर्यंत. |
| ४ | एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षा फी पेमेंट गेटवे द्वारे ऑनलाईन पध्दतीने भरणा करणे. | दिनांक ०१.०८.२०२३ ते दिनांक २१.०८.२०२३ पर्यंत. |
| ५ | परीक्षक, समालोचक व उपमुख्य समालोचक नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे | दिनांक ०१.०८.२०२३ ते दिनांक २१.०८.२०२३ पर्यंत. |

**परीक्षा फी तपशील खालील प्रमाणे.**

| परीक्षेचे नाव | परीक्षा फी प्रति विद्यार्थी | केंद्र खर्चाची रक्कम प्रति विद्यार्थी | प्रश्नपत्रिकांच्या छायांकित प्रत प्रति विद्यार्थी रक्कम | ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| एलिमेंटरी इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा (महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरिता) | रु.५०/- | रु.२०/- | रु.१०/- | रु.५० - रु.३० = **रु.२०/-** |
| इंटरमिजिएट इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा(महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरिता) | रु.१००/- | रु.२०/- | रु.१०/- | रु.१०० -रु.३० = **रु.७०/-** |
| एलिमेंटरी इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा (महाराष्ट्रा बाहेरील विद्यार्थ्यांकरिता) | रु.१००/- | रु.२०/- | रु.१०/- | रु.५० - रु.३० = **रु.७०/-** |
| इंटरमिजिएट इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा(महाराष्ट्रा बाहेरील विद्यार्थ्यांकरिता) | रु.२००/- | रु.२०/- | रु.१०/- | रु.१०० -रु.३० = **रु.१७०/-** |

ऑनलाईन पध्दतीने करावयाची नोंदणी व संबंधित माहिती www.doa.maharashtra.gov.in / https://dge.doamh.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

(नागेश म. वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

केंद्र प्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा तथा मुख्याध्यापक /प्राचार्य (सर्व).

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय, नागपूर/औरंगाबाद.
३) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
४) उप आयुक्त, परीक्षा परिषद, पुणे.
५) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.

६) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
७) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद (सर्व)
८) शिक्षणाधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका (सर्व)
९) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई.
१०) प्राचार्य, संगीत आणि कला अकादमी, कला विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, शिक्षण विभाग, मुंबई.
११) जिल्हा विद्यालय निरीक्षक, (सर्व) उत्तरप्रदेश / मध्यप्रदेश / उत्तराखंड/ छत्तीसगढ.
१२) निवड नस्ती.